# महात्मा गांधींची धर्म संकल्पना

**डॉ. निळकंठ कामण्णा लोखंडे,** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)(घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा)

---

**प्रस्तावना :**

म. गांधींची धर्मकल्पना आणि त्यांची सर्वधर्मसमभावाची कल्पना हा विषय रुक्ष वाटण्याची शक्यता आहे. पण आजच्या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेता आणि आजूबाजूचं सगळं जे धर्मविषयक वातावरण आहे, ज्या प्रकारची माणसांची धार्मिकता आहे, हे पाहता, माणसं या धार्मिकतेनं आंतरिकदृष्ट्या समाधानी आहेत का? असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. आजचं जे स्वरूप आहे आणि विशेषतः नव्वदोत्तर काळात जागतिकीकरणाच्या कालखंडामध्ये बाजारपेठेच्या प्रभावाखाली आलेलं जे स्वरूप आहे, ते जास्त चिंताजनक आहे. एका बाजूला तो उत्सवी बनत चाललेला आहे, त्याचे इव्हेन्टस् होतात, फेस्टिवल्स होतात. या अर्थानं धर्म कल्पनेतील गांभीर्य संपलेलं आहे. डीजेच्या आवाजात आणि प्रतीकांच्या भाऊगर्दीत तो हरवून गेला आहे. दुसऱ्या बाजूनं धर्म ही एक मानवी जीवनातील आणि मानवी संस्कृतीतील विधायक शक्ती आहे, असं जे धर्माविषयी मानलं जात होतं, त्याच्या उलटा अनुभव जगभर येताना दिसतोय. हा अनुभव भारतातच येतो असं माझं म्हणणं नाही, इतर देशातही तो येत आहे. समाजाचं विभाजन, ध्रुवीकरण, त्याचबरोबर ध्रुवीकरणाचा पुढचा टप्पा म्हणून काही ठिकाणी दंगे-धोपे, या सगळयांमधून धर्म हा माणसाच्या आंतरिक गरजेऐवजी कुठंतरी त्याला बाह्यतः व्यक्त होण्यासाठी लागणाऱ्या 'अस्मितेचं हत्यार' या स्वरूपात पाहिला जात आहे. त्यामुळे एका अर्थानं धर्माला अस्मितेच्या हत्याराचं स्वरूप प्राप्त होताना आज आपल्याला दिसतं. सगळे प्रचलित धर्म अस्तित्वात असूनही लोकांना आपल्या धर्मजीवनाचा आंतरिक आनंदही घेता येत नाही, याचं सगळं जे असमाधान आहे, ते दुसऱ्या बाजूनं अनेक नव्या संप्रदायांना जन्म देणारं आहे. प्रस्थापित धर्म असताना अनेक नवनवे धार्मिक संप्रदाय निर्माण झालेले आपल्याला दिसतात. हे संप्रदाय लोकांच्या कुठल्या ना कुठल्या मानसिक गरजेला पूर्ण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्या पूर्ण होतात की नाही हा भाग वेगळा, पण असं एक चित्र आपल्याला दिसतं. असे अनेक धर्मसंप्रदाय आपल्याला सांगता येतील. एका अर्थानं या सगळ्या प्रचलित धर्मांचा आज चालू असणारा जो व्यवहार आहे, त्याचं जे रस्त्यावरचं अस्मिताजन्य अवतरणं आहे. त्यानं अनेक भागांमध्ये दंगली किंवा गडबड झाल्याचं आपल्या लक्षात येतं.

माणसाला सनातन काळापासून ज्या प्रकारच्या अध्यात्माची ओढ आहे, ज्या प्रकारच्या पूर्णत्वाची ओढ आहे, त्या प्रकारच्या अध्यात्मापासून आजचे सर्व धर्म व प्रत्यक्षातला त्यांचा व्यवहार शेकडो-कोसो दूर आहे, असं आपल्याला दिसतं. म्हणून मग कोणत्याही सुजाण नागरिकाला, धर्मपालन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला आणि स्वतः धर्मपालन करत नसले तरीसुद्धा इतरांच्या बरोबर या समाजात राहत असताना कोणत्या प्रकारचं धर्मपालन व्हावं याची अपेक्षा करणाऱ्या सुजाण नागरिकांना यातून कोणता पर्याय पुढे आहे, याच्याविषयी आज पूर्ण गोंधळ झालेला आहे. धर्म आणि राज्यसंस्थेचं नातं तोडण्याचाही प्रयोग अनेक देशांमध्ये झाला. आपण त्या प्रकारची राज्यघटना स्वीकारली, पण शेवटी जे राज्यकर्ते आपल्याला लाभले त्यांनी आपापल्या हितसंबंधानुसार धर्मनिरपेक्षतेचा किंवा धर्माचा अर्थ लावला. गांधींच्या धर्मकल्पनेचा जो प्रवास आहे, ती त्यांची जीवनाची साधना आहे. गांधी स्वतःकडे कायम साधक म्हणून, जीवनाचा उपासक म्हणून आणि सत्याचा शोधक म्हणून पाहतात. त्यामुळे माझ्या जीवनातल्या प्रत्येक गोष्टीला धर्म-भावनेतून निर्माण होणारं नैतिक जीवनाचं अधिष्ठान असलं पाहिजे, अशा प्रकारची भूमिका गांधींच्या सर्व व्यवहारामध्ये, सर्व कार्यक्रमांमध्ये आपल्याला पाहायला मिळते.

गांधींच्या धर्मकल्पनेकडे वळण्यापूर्वी गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची एक चौकट मला आपल्यापुढे ठेवायची आहे. माझ्या मतानुसार विसाव्या शतकात जगातला सर्वांत निर्भय, सर्वांत बलवान आणि सर्वांत धैर्यशाली माणूस म्हणून कुणाचा उल्लेख करायचा झाला तर तो गांधींचा करावा लागेल. अत्यंत कृश शरीरयष्टी, कोणत्याही प्रकारच्या शस्त्राचा आधार नाही, शास्त्राचा आधार आहे किंवा नाही माहीत नाही, कोणी पाठिंबा देईल किंवा नाही याची

फिकीर नाही, स्वतःच्या सदसदविवेक बुद्धीला, नैतिकतेला पटेल तेच करणं, यासाठीचं विलक्षण धैर्य गांधींनी विसाव्या शतकात प्रकट केलेलं आपल्याला दिसतं.

दुसरं गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचं एक अत्यंत महत्त्वाचं, पण आपल्याला न पेलणारं वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे त्यांचं अत्यंत कठोर असणारं मूल्याचरण. जी जी मूल्यं मी मानली, त्यांचं स्वतःच्या जीवनामध्ये अत्यंत कठोरपणे आचरण करेन, ही गांधींची प्रतिज्ञा होती. प्रत्यक्षात त्यांचा व्यवहारही तसा होता. म्हणजे एका बाजूला व्यक्तिगत जीवनात मूल्यांचा कठोरपणा आणि सार्वजनिक जीवनात थोड्या तडजोडीची तयारी. आजच्या संदर्भात आपल्या सगळ्यांच्या जगण्याकडे जर पाहिलं तर याच्या बरोबर उलट परिस्थिती आपल्या लक्षात येईल. तिसरं गांधींचं मला भावलेलं वैशिष्ट्य असं आहे की, 'मी जे काही करणार आहे, ते जाहीरपणे सांगून आणि त्याचे परिणाम विनातक्रार भोगण्याची तयारी ठेवून करणार आहे. मी सत्याग्रह केला व माझ्यावर खटला झाला, तर मी जामीन देणार नाही. मी कायद्यानं होईल ती शिक्षा द्या, हाच आग्रह धरणार व शिक्षा भोगणार.' याचा एक परिणाम लक्षात घेण्यासारखा आहे.

महात्मा गांधींची धर्माबाबतची संकल्पना ही पूर्णपणे वेगळी होती. त्यांनी आपले धर्म विशयक विचार सर्व धर्मांच्या तत्वांचा समावेष करून मांडले आहे. महात्मा गांधीजींची धर्म संकल्पना पुढील मुद्दयाच्या आधारावर आपण समजून घेऊ.

**1) विश्वधर्म आणि मानवताधर्म:** गांधींनी धर्म हा शब्द संप्रदाय या अर्थाने वापरलेला नाही. गांधींनी विश्वधर्म किंवा मानवाताधर्म अशी संकल्पना मांडतात. त्यांना सर्व धर्मांबाबत आदर होता. गांधींजीच्या मते, सर्व माणसे ही परमेश्वराचीच लेकरे आहेत. म्हणूनच मनुष्यसेवा हीच ईश्वरसेवा आहे आणि तोच खरा धर्म आहे. महात्मा गांधी हे श्रध्दावान होते. महात्मा गांधीची धर्माबाबतची कल्पना जरी हिंदू धर्माशी निगडित असली तरी त्यांची धर्माची कल्पना हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द या धर्मांच्या पलीकडची आहे. सर्व धर्मांचा अभ्यास केल्यानंतर सर्व धर्मांमध्ये काही समान तत्वे असताता हा विचार गांधींनी मांडला प्रत्येक धर्म हा प्रेम आणि अहिंसा यांचा पुरस्कार करतो त्यामुळे एका अर्थाने सर्व धर्म सारखेच असतात असे त्यांनी म्हटले आहे.

**2) सत्याचा आदर करणारी धार्मिकता:** महात्मा गांधीप्रणीत धर्मचिंतन व धार्मिकतेचा आज ख-या अर्थाने आक्रमक आग्रह धरावा लागेल. गांधींची धार्मिकता सर्वधर्मांचा नव्हे तर सर्वधर्मांतील सत्याचा आदर करणारी होती. त्यांच्या प्रार्थना अस्मितेचे पोषण करीत नव्हत्या. तर त्या माणसाला त्याच्या मर्यादांची व क्षमतांची जाणीव करून देणा-या होत्या. आश्रमात प्रार्थना होत असत पण गांधींनी आश्रमात मंदिर बांधू दिले नाही. सत्य आणि अहिंसेच्या प्रकाशात धर्मतत्वांची त्यांनी चिकित्सा केली. सद्सदविवेकबुध्दी आणि धर्मग्रंथात विरोध उत्पन्न झाल्यास सदसद्विवेकबुध्दीचा आवाज प्रमाण मानण्यास महात्मा गांधी सांगतात. विज्ञान, विवेक आणि मानवतावादी मूल्ये नाकारणा-या धर्मरूढींना त्यांनी सतत नाकारले. आजच्या धार्मिकतेला महात्मा गांधींच्या धर्मविवेकातून येणा-या भावात्मक धर्मनिरपेक्षतेची जोड त्यास द्यावी लागेल. धर्मसत्तेच्या विरोधात केलेला हा गांधींचा हस्तक्षेप नव्या धर्मनिरपेक्षतेची वाट सांगणारा आहे.

**3) हिंदू - मुस्लिम ऐक्य:** महात्मा गांधींनी धर्मांबाबत आपले विचार मांडताना हिंदू-मुस्लि ऐक्यावर भर दिला आहे. गांधींनी स्वातंत्र्यप्राप्ती इतकेच महत्व हिंदू-मुस्लिम ऐक्याला दिले आहे. एकवेळ स्वातंत्र्य उशिरा मिळाले तरी चालेल परंतु हिंदु-मुस्लिम ऐक्य आधी झाले पाहिजे. दोन्ही धर्माच्या लोकांनी आपल्या धर्मातील गोष्टी चांगल्या प्रकारे समजून घेऊन त्यांचे आचरण केले पाहिजे. हिंदू व मुसलमान यांनी परस्परविश्वास ठेवला तर सर्व सुरळीत पार पडेल अशी गांधींची खात्री होती. हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी दोन्ही धर्मांतील विचारी, बुध्दिमान माणसांनी एकत्र येऊन संघर्षाऐवजी सहिष्णुता निर्माण केली पाहिजे अशी गांधीजींची अपेक्षा होती. गांधींनी स्वतः धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे हिंदू -मुस्लिम तणावाचा विचार धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीकोनातून करण्याऐवजी त्यांनी तो धर्माच्या चौकटीत राहूनच केला. सर्व धर्मांत समान मूल्ये असतात. त्यांच्या आधारावर सर्व धर्मांत ऐक्य साधले जावे. तणाव दूर केला जावा असे गांधींनी म्हटले होते.

**4) धार्मिक एकात्मता:** हिंदू राष्ट्रवाद ही महात्मा गांधींना न रूचणारी गोष्ट होती. भारतात स्वातंत्र्यपुर्व काळात निरनिराळया धर्माचे लोक राहातात म्हणून ते एक राष्ट्र होऊ शकत नाही असा युक्तिवाद केला जात होता तो युक्तिवाद महात्मा गांधीजींनी खोडून काढला. गांधींजींच्या मते, भारत हा देश सर्व धर्मांच्या लोकांसाठी आहे कारण येथ सर्व धर्मांचे लोक एकत्र राहतात. अनेक धर्म असून देखील ते एकमेंकांच्या धर्मामध्ये हस्तकक्षेप न करता एकात्मतेने राहतात. गांधींच्या मते, भारत जर हिंदूंचा राष्ट्र आहे असे जर कोणी म्हणत असतील तर ते चुकीचे आहे. भारतात अनेक वर्षापासून हिंदूच्या बरोबर मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, पारशी आणि शीख असे अनेक धर्मिय लोकांनी भारत हा देश आपला मानला आहे. सर्व धर्मातील लोक एकमेकांना बांधव मानत आहेत. स्वतःच्या आणि देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी ते सतत एकत्रित राहतील. गांधींच्या मते, भारत स्वतंत्र झाल्यावर ते हिंदू राज्य असणार नाही. कोणत्याही एका धर्माचे राज्य न राहता ते सर्व धर्मियांचे राज्य असेल. म्हणजेच धर्म किंवा संप्रदाय ही खाजगी बाब आहे. धर्माला सर्वाजनिक जीवनात अजिबात स्थान असणार नाही. अशारीतीने राजकारण हे संप्रदायापासून अलिप्त असावे अशी कल्पना गांधींनी मांडली होती.

**5) सर्व धर्मांची मुलतत्वे समान:** महात्मा गांधींच्या मते, सर्व धर्मांची मूलतत्वे समान आहेत. अहिंसा हे सर्व धर्मांत सापडणारे एक सूत्र आहे. त्यामुळे सर्व धर्माच्या लोकांनी एकत्र येऊन त्यांच्या त्यांच्या धर्मानुसार समान साध्याकडे जाणारे योग्य मार्ग निवडावेत व स्वातंत्र्य साध्य करावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत परस्परांमधील मतभेद, भांडणे मिटवावीत. किमान इंग्रजांची मध्यस्थी स्वीकारू नये असे गांधींजी म्हणतात. सर्व-धर्म-समभावाकडे वळताना ती संकल्पना आज मला महत्त्वाची वाटते, कारण तिची आजची प्रस्तुतता या सगळ्याशी संबंधित आहे. सर्व-धर्म-समभाव ही संकल्पना भारतामध्ये हेटाळणी झालेली संकल्पना आहे. एका बाजूला धर्मनिरपेक्षवाद्यांनी तिची हेटाळणी केली, दुसऱ्या बाजूला नास्तिक्य बाळगणाऱ्यांनी हेटाळणी केली, तिसऱ्या बाजूला हिंदुत्ववादी प्रवाहांनीही तिची हेटाळणी केली. प्रत्यक्षात या संकल्पनेत काय क्रांतिकारकता आहे, हे या तिन्ही प्रवाहांना उमगलेलं नाही. गांधी जेव्हा असं म्हणतात की, सर्व धर्म समान आहेत. म्हणजे ते असं म्हणतात की, माझा धर्म किती चांगला आहे हे मला माहीत आहे, पण दुसऱ्या धर्मातील चांगलंही मला माझ्या धर्मांत आणायचं आहे. सर्व धर्म समान असल्यामुळे त्याही धर्मात काहीतरी चांगलं असणार आहे आणि ते मला गोळा करायचं आहे. हे करायला सर्व धर्म समान आहेत, हे म्हटल्याशिवाय जागा नाही. आणि या पद्धतीनं त्यांचं म्हणणं आहे की, प्रत्येक धार्मिक माणसानं स्वतःच्या धर्माचा विचार केला पाहिजे व चिकित्साही. मुसलमानांनी या पद्धतीनं आपल्या धर्माची चिकित्सा करावी, ख्रिश्चनांनी करावी, शिखांनी करावी; जेवढे जेवढे धर्म, पंथ म्हणवतात त्यांनी स्वतःच्या धर्म-पंथांची या पद्धतीनं चिकित्सा करावी. ही जर सवय माणसाला लागली तर दुसऱ्या धर्मातील चांगलं शोधण्याच्या प्रेरणा ज्या वेळेला सर्व धर्मांमध्ये बळकट होतील, तेव्हा धर्माच्या आधारे होणारं विभाजन आणि संघर्ष यांचं मूळ संपुष्टात येईल, हा त्याचा सगळ्यात मोठा फायदा आहे.

**6) धर्म आणि राजकारण:** धर्म आणि राजकारण यांची फारकत महात्मा गांधीजींना मान्य नव्हती. धर्म हा राजकारणाचा आधार असला पाहिजे असा गांधींचा आग्रह होता. महात्मा गांधींजीच्या मते, मूल्याधिष्ठीत नैतिक राजकारण असावे असे वाटत असेल तर धर्म आणि राजकारण हे एकमेकांपासून वेगळे करता येणार नाही. राजकारण व धर्म हे वगेवेगळे असावे असे मानणा-या लोकांना धर्माचे ज्ञान नाही असे गांधीजी म्हणत असत. कारण वाईट प्रवृत्तींवर विजय मिळविणे हे धर्मात शिकविले जाते व त्यांची राजकारणात अपेक्षा असते. राजकारणावर वाईट गोष्टीवर विजय मिळवूनच राज्यकारभार शक्य होतो. राजकारणाला धर्माचे अधिष्ठान हवे असे जेव्हा गांधीजी म्हणतात. तेव्हा त्यांच्या मनात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख असे धर्म नसतात. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मानवता धर्म होय. सर्व धर्मांबद्दल आदर असून कोणत्याही एका धर्माप्रमाणे राजकारण चालवावे असे ते मानीत नाहीत. महात्मा गांधी धर्म आणि राजकारण याबाबतीत असे म्हणाले की, 'मी जीवनाचा नम्र उपासक आहे. मी सत्याचा शोधक आहे. मी धर्मभावना मानतो आणि मला लोकांची सेवा करायची आहे आणि लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणाइतकं उत्तम क्षेत्र नाही. म्हणून मला राजकारणातून जो धर्म आता बाद झालेला आहे, तो धर्म पुन्हा राजकारणात प्रस्थापित करायचा आहे.' इथं रूढ अर्थाचा धर्म नाही, ती धर्मभावना आहे. आजचं राजकारण

मूल्यावर आधारलेलं झाल्याशिवाय या रूढ धर्माच्या आधारे निर्माण झालेले सगळे भेदाभेद संपणार नाहीत. म्हणून गांधी असं म्हणतात की, सार्वजनिक जीवनात धर्म जर अटळ असेल तर अटळ असणाऱ्या धर्मामध्ये संवाद हासुद्धा अटळ गोष्ट आहे. इथं स्पर्धा नको, संवाद हवा. तो संवाद प्रत्येकानं दुसऱ्या धर्माचा आदर केला तरच शक्य होईल. दुसऱ्याचा द्वेष करून किंवा दुसऱ्याच्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करून असा संवाद होणार नाही. तेव्हा असा संवाद होण्यासाठी सर्व धर्मांकडे समान नजरेनं पाहण्याची भूमिका तुम्हाला घेता यायला पाहिजे. मुळातच मी जेव्हा चांगल्या प्रकारचा हिंदू होण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा मला चांगल्या प्रकारचा मुसलमान होता यायला पाहिजे, चांगल्या प्रकारचा शीख, ख्रिश्चन होता यायला पाहिजे. आणि हे मला हिंदू राहून करता यायला पाहिजे. याचाच अर्थ सर्व धर्मातल्या चांगल्या मूल्यांचा संग्रह माझ्या धर्मामध्ये वा दुसऱ्या माणसाच्या धर्मामध्ये त्यानं त्या पातळीवर करायला हवा, व्हायला हवा. म्हणून सतत धर्माची चिकित्सा व्हायला हवी असे गांधी म्हणतात.

महात्मा गांधींचे राजकीय विचार हे त्यांच्या नैतिक, धार्मिक, आर्थिक व सामाजिक विचारांमध्ये इतके मिसळून गेले आहेत की, त्यांनी मुळी स्वतंत्र अस्तित्वच राहिलेले नाही. गांधींच्या मते, राजकारण हे धर्माला साहाय्यभूत असते तर धर्माशिवाय राजकारण असूच शकत नाही. राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना करणे हा खरा अध्यात्मीकरणाचा हेतू असतो. राजकारणाला धर्माचे अधिष्ठान हवे परंतु त्याचा अर्थ राज्यकारभाराची सूत्रे धर्मगुरूंच्या हातात असावीत असा नव्हे. एकाच धर्माला राजाश्रय देणे किंवा राज्याचा असा विशिष्ठ धर्म असणे हे देखील त्यांना मान्य नाही. राजकीय विचार हे सत्य, प्रेम, अहिंसा या विचारांवर आधारित ठेवणे म्हणजे राजकारणाचे आध्यात्मीकरण होय असे गांधी मानतात.

**समारोप:** अशाप्रकारे गांधींनी राश्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी सर्वधर्मसमभाव असणे किंवा धार्मिक सलोखा असणे अत्यंत आवश्यक म्हटले आहे. धार्मिक सलोखा किंवा सर्वधर्मसमभाव या संकल्पना धर्मनिरपेक्षतेशी निगडितच आहेत त्यांच्यात परस्परविरोध नाही. प्रार्थना, व्रते, संन्यास, वैराग्य, वर्णधर्म आदींना गांधींनी नवे आयाम दिले. समाजविन्मुख, गुहाकेंद्री गूढ, धूसर सामान्यांना न कळणारं अध्यात्म गांधींनी समाजसन्मुख केलं. लोकांना कळेल व भावेल असा त्याचा अर्थ लावला. प्रत्यक्ष जीवनानुभव व आपली प्रतिभा, चिंतनशीलता यांनी गांधींनी सहज पेलतील असे कार्यक्रम लोकांना दिले. सवर्णांना विवेकाची टोचणी लावली व धर्म परिवर्तनाकुल केला. गांधी आधुनिक पद्धतीनं, विचारवंतांच्या पद्धतीनं लेखन करणारे नसल्यामुळे आपल्याला ते बुरसटलेले, मागास, प्राचीन गोष्ट सांगणारे, वर्णव्यवस्थेची तरफदारी करणारे असे वाटतात. आपण त्यातला अन्वयार्थ कधी शोधत नाही. पण त्यांची सर्व-धर्म-समभावाची संकल्पना आजच्या काळात महत्त्वाची आहे. ज्या काळात जगभर धर्म हा विभाजनाचं साधन बनत आहे, 'अस्मितेचं हत्यार' बनतो आहे, जगाला संकटाच्या खाईकडे नेण्याचं साधन बनतोय. धर्म विभाजक आहे, तो जगाच्या ऐक्याकडे जाणारा नाही. धर्मच जर राहणार असेल तर मग तो कसा रहावा, ही प्रत्येक सामान्य माणसाची, नागरिकाची चिंतेची बाब असली पाहिजे. चिंतेचा विषय असला पाहिजे. कारण त्याच्यातूनच धर्म प्रगल्भ होण्याची शक्यता आहे.

**संदर्भ :**

१. Gandhi M. K., (1950), Hindu Dharma, Ahmdabad, Navajivan Publishing House.
२. गांधी मो. का. (२००५), नैतिक धर्म, अहमदाबाद, नवजीवन पब्लिशिग हाउस.
३. द्वादशीवार सुरेश, (२०१९), गांधी आणि त्यांचे टीकाकार, पुणे, साधना प्रकाशन.
४. सुमंत यशवंत, (२०२१), महात्मा गांधींची विचारसृष्टी काही अलक्षित पैलू, पुणे, साधना प्रकाशन.
५. कुरुंदकर नरहर, (२०१५), शिवरात्र, पुणे, देशमुख आणि कंपनी (प्रकाशक) प्रायव्हेट लिमिटेड.
६. पांढरीपांडे सु. श्री., (२००८), स्वराज्य : दिशा आणि दर्शन, पुणे, प्रतिमा प्रकाशन.